राज्यात पाणी पुरवठा योजनेसाठी वापरण्यात येणाऱ्या HDPE/PVC जलवाहिन्यांचे वापरायोग्य नसणारे शिल्लक तुकडे/तुटके भाग कामाच्या ठिकाणी पडून न राहण्याची दक्षता घेण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग

शासन परिपत्रक क्रमांकः ग्रापापु-२०१९/प्र.क्र.३२/पापु-०७

गोकुळदास तेजपाल रुग्णालय परिसर, सातवा मजला,

नवीन मंत्रालय, मुंबई-४०० ००१.

तारीख : ०१ जून, २०१९

शासन परिपत्रक:

राज्यात पाणी पुरवठ्याच्या योजना महाराष्ट्र जीवन प्राधिकरण व जिल्हा परिषदांमार्फत राबविण्यात येतात. अशा योजना राबवितांना वापरण्यात येणाऱ्या विविध एचडीपीई/पीव्हीसी जलवाहिन्यांचे वापरात न येणारे लहान तुकडे/ तुटके भाग, तसेच HDPE/PVC पाईप्स जोडतांना तयार होणारा कचरा त्याच ठिकाणी विखुरलेल्या स्वरुपात सोडला जातो. सदर साहित्य निरुपयोगी असले तरी, हा अविघटनशील स्वरुपाचा कचरा पडून राहिल्याने पर्यावरणविषयक समस्या निर्माण होतात. सदर समस्या टाळण्यासाठी पाणी पुरवठा योजनेसाठी वापरण्यात येणाऱ्या HDPE/PVC जलवाहिन्यांचे शिल्लक तुकडे/तुटके भाग इ. साहित्याची योग्यरित्या विल्हेवाट लावण्याबाबत संबंधित कंत्राटदारास सूचना देण्याची दक्षता अंमलबजावणी यंत्रणांनी (जिल्हा परिषद, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण) घ्यावी. तसेच जलवाहिन्यांचे वापरायोग्य नसणारे तुकडे/तुटके भाग इ. साहित्य कामाच्या ठिकाणी विखुरलेल्या स्वरुपात राहणार नाही याची जबाबदारी संबंधित उप अभियंता/शाखा अभियंता यांची राहील. कंत्राटदारांनी हा HDPE/PVC कचरा गोळा करून इतरत्र न टाकून देता पुर्नप्रक्रियेसाठी पुर्नवापर करणाऱ्या कंपन्या/संस्था/व्यक्ती यांच्याकडे पाठवावे.

०२. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेताक २०१९०६०११२१२२३०७२८ असा आहे. सदर परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ganesh Nivrutti Pawar

Digitally signed by Ganesh Nivrutti Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Urban Development Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=805bdef8ce1424c02121cece0d20e917ffa1ef512d7e8fa2e49d93adbb5ad352, cn=Ganesh Nivrutti Pawar
Date: 2019.06.01 12:32:25 +05'30'

(गणेश पवार)

अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.

२. संचालक, भूजल व सर्वेक्षण विकास यंत्रणा, पुणे.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
४. संचालक, पाणी व स्वच्छता सहाय्य संस्था, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
५. कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता, जिल्हा परिषद (सर्व).
६. मा. अ.मु.स., पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई
७. सर्व अवर सचिव/कक्ष अधिकारी, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई